अस्सल सोलापुरी


# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

२६ नोव्हेंबर

आज संविधान दिन




देशाची अखंडता, समानता, बंधुता टिकवण्यात मोलाचे योगदान देणाऱ्या संविधानाला त्रिवार अभिवादन!

www.surajyadigital.com । बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ५८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# ‘झेडपी’च्या निवडणुका ‘व्हेंटिलेटर’वर

## वेट & सी

## ५० टक्के मर्यादा ओलांडल्याची माहिती कोर्टाने मागवली

## आवश्यकता भासल्यास खंडपीठ स्थापन करण्याचा कोर्टाकडून विचार

✔ नवी दिल्ली

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेल्या प्रकरणी मंगळवारी (२५ नोव्हेंबर) सर्वोच्च न्यायालयात महत्वाची सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्यासंबंधी सविस्तर माहिती मागवली असून सर्वोच्च न्यायालायात याप्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी म्हणजे २८ नोव्हेंबर रोजी ठेवली आहे.५० टक्के मर्यादा ओलांडल्याची माहिती कोर्टाने मागवली असून शुक्रवारपर्यंत राज्यातील झेडपी,पंचायत समित्या आणि कार्पोरेशनच्या निवडणुका जाहीर करण्यास ब्रेक लावण्यात आला आहे.**




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत १५७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याचा दावा करण्यात आला होता. याप्रकरणी झालेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने आपण शुक्रवारी अंतरिम आदेश देऊ असे सांगितले आहे. शुक्रवारी दुपारी १२ वाजता ही सुनावणी होणार आहे.

ते पुढे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, ओबीसींना आरक्षण मिळाले पाहिजे, त्यांना रिप्रझेंटेशन मिळाले पाहिजे. मात्र यासाठी आवश्यक असेल तर मोठे खंडपीठ जर स्थापन करायचे असेल तर त्याचाही विचार केला जाऊ शकतो. आमची मागणी होती की, छ. संभाजीनगर, मुंबई अशा महापालिकांमध्ये पाच-सहा वर्षांपासून प्रशासक आहेत. ९० टक्क्यांपेक्षा जास्त महाराष्ट्र प्रशासकांच्या ताब्यात आहे. त्यामुळे निवडणुका लवकर घ्याव्यात अशी आमची सर्वोच्च न्यायालयाकडे मागणी होती. न्यायालयाने सांगितले की, निवडणुका लवकरात लवकर घ्याव्यात हा जो महत्वाचा मुद्दा आहे, त्यावर आपण लवकर निर्णय घेऊ. मात्र, यात चालू शकणारा उपाय काय आहे, यासाठी शुक्रवारची सुनावणी आहे, असे वकील देवदत्त पालोदकर यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील ५ आदिवासी जिल्हे आणि काही इतर जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा वाढली आहे आणि ते ५० टक्क्यांच्या पुढे गेले आहे. अशा स्थानिक स्वराज्य संस्था १५७ आहेत. आणि यामध्ये दोन महापालिकांचाही समावेश आहे. त्यामुळे आता राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयापुढे माहिती सादर करतील. सर्वोच्च न्यायालयाने सर्व राजकीय पक्षांनाही शॉर्ट नोट सादर करण्यास सांगितले आहे. संवैधानिक आदेशाच्या माध्यमातून निश्चित केलेल्या कालावधीत निवडणुका घेण्यासाठी आणि आरक्षण धोरणे सुसंगत करण्यासाठी काहीतरी उपाय शोधला जाईल असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे आणि त्यानंतर पुढील निवडणुका जाहीर होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, म्हणजेच नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुका नियोजित कार्यक्रमानुसार होतील आणि त्या संबंधीचा निर्णय हा याचिकांच्या निकालावर अवलंबून असेल. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महानगरपालिका निवडणुका या शुक्रवारपर्यंत जाहीर होणार नाहीत, असेही पालोदकर यांनी सांगितले.

यावेळी सॉलिसिटर जनरल याप्रकरणात वेळ आणखी वाढवून देण्याची मागणी केली. ही मागणी मान्य करत सर्वोच्च न्यायलयाने याप्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी ठेवली आहे.

विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा दावा आहे की, काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा अनुपात घटनात्मक ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात आला आहे, जे कायद्याच्या विरोधात आहे. बांठिया आयोगाच्या अहवालाचा संदर्भ घेत आरक्षणाची रचना योग्य पद्धतीने करण्यात आली आहे, असा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला आहे. दरम्यान, राज्यातील ४० नगरपरिषदांमध्ये आरक्षणाच्या ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन झाले, याची माहितीही समोर आली आहे.

### वकिलांनी काय सांगितले?

पुढील सुनावणी येत्या शुक्रवारी, २८ तारखेला दुपारी १२ वाजता ठेवण्यात आली आहे. ज्या निवडणुकींचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यासंदर्भात कोर्टाची अशी मनस्थिती दिसली की, जरी त्या निवडणुका झाल्या तरी अंतिम निकालाच्या अधीन राहून त्याचा निर्णय होऊ शकतो. पण मंगळवारी तसा काही आदेश देण्यात आला नाही. पण एकंदरीत न्यायालयाची मानसिकता अशी होती की, आम्ही निवडणूक थांबवणार नाही, अशी माहिती वकील मंगेश ससाणे यांनी दिली.

### न्यायालयात नेमके काय झाले?

न्यायालायात झालेल्या एकंदरीत सुनावणीबाबत पालोदकर यांनी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, राज्यात ज्या ठिकाणी आरक्षणाची मर्यादा वाढली आहे, त्या ठिकाणचा सविस्तर डेटा सादर करण्यासाठी सॉलिसिटर जनरल आणि निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाकडे मुदत मागितली. नियम असा आहे की, एससी, एसटी आणि ओबीसी यांच्यासाठीचे आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा पुढे जाऊ नये. या के कृष्णमूर्ती यांच्या खंडपीठाच्या निर्णयाचे पालन करण्यासाठी याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत आणि त्यावर सुनावणी सुरू आहे.

---

## अपात्र असणाऱ्या १५४ लाडक्या बहिणींची चौकशी

### जिल्हा परिषदेला यादी प्राप्त




✔ सोलापूर/प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अपात्र असूनही लाभ घेतलेल्या १५४ महिला कर्मचाऱ्यांची यादी अखेर जिल्हा परिषद प्रशासनाला मिळाली असून, विभागनिहाय चौकशीला सुरुवात झाली आहे. दोषी आढळणाऱ्या लाडक्या बहिणींवर कारवाई होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

राज्यातील विविध जिल्हा परिषदांमधील तब्बल १ हजार १८३ महिला कर्मचाऱ्यांनी सेवेत असताना योजनेचा लाभ घेतल्याचे उघड झाले आहे. त्यापैकी सोलापूर जिल्ह्यातील १५४ महिला कर्मचारी लाडक्या बहिणींचा समावेश आहे. महिला व बालकल्याण विभागाने ही यादी जिल्ह्यांना पाठवून चौकशीचे आदेश दिले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने ही यादी प्रत्येक विभागाला देऊन सेवेत कार्यरत असलेल्या महिलांची नावे पडताळून तातडीने कळविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांची नावे लवकरच समोर येणार आहेत.राज्य शासनाने योजनेस अपात्र असलेल्या कर्मचाऱ्यांनी घेतलेली आर्थिक मदत परत घेण्याचा निर्णय घेतला आहे. लाडकी बहीण योजनेंतर्गत जुलै २०२४ पासून प्रति महिना १ हजार ५०० रुपये रक्कम जमा होत असून, आतापर्यंत जवळपास १५-१६ हप्त्यांमध्ये सुमारे २४ हजार रुपये जमा झाले आहेत. ही संपूर्ण रक्कम कर्मचाऱ्यांकडून वसूल केली जाणार आहे.महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव यांनी ग्रामविकास विभागाला दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाईच्या सूचना दिल्या असून, जिल्हा परिषद प्रशासनाने चौकशी प्रक्रिया वेगाने सुरू केली आहे.

---

## संगदरी येथे ट्रॅक्टरवरून कोसळल्याने तरुण ठार

✔ **सोलापूर :** ट्रॅक्टरवर काम करीत असताना तोल जाऊन खाली कोसळून चाकाखाली सापडल्याने २८ वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात सोमवारी सायंकाळच्या सुमारास संगदरी (ता. दक्षिण सोलापूर) येथे घडला. नितीन जगन्नाथ वाघे (वय २८ रा. बोरामणी ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. तो काल सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास संगदरी ते मुस्ती रोडवरील गौरीशंकर हादरे यांच्या शेताजवळ ट्रॅक्टरने काम करीत होता. त्यावेळी तो खाली कोसळून चाकाखाली सापडून गंभीर जखमी झाला होता. त्याला शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

---

## सावळेश्वरजवळ बसच्या धडकेने पिकअपमधील महिला ठार

### १२ प्रवासी जखमी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

वेगाने जाणारी खासगी बस साईडने धडक दिल्यामुळे पिकअप उलटून १ महिला ठार तर १२ प्रवासी जखमी झाले. हा अपघात मंगळवारी सकाळच्या सुमारास पुणे महामार्गावरील सावळेश्वर दर्ग्याजवळ घडला. ते सर्वजण पिकप मधून वैराग ते पाकणीकडे निघाले होते.

वत्सला नारायण चवरे (वय ७०, रा. डोराळे, ता.बार्शी) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. तर लोचना नामदेव चवरे (वय ८० ), शहाजी चौरे (वय ५०),परमेश्वर चवरे (वय ५५), मैना नाळे (वय ५०), रामहरी चवरे (वय ६३), कौशल्या मदने (वय ४५), शकुंतला चवरे (वय ६०), मोहन चोरमले (वय ६०), कौशल्य चवरे (वय ४५), ज्ञानेश्वर चवरे (वय ३२),उर्मिला धायगुडे (वय ४०) आणि अश्विनी सलगर (वय ४५ सर्व रा.डोराळे ता. बार्शी) अशी जखमींची नावे आहेत.

त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे ते सर्वजण पिकप मध्ये बसून वैराग ते पाकणी असा प्रवास करीत होते.सकाळी वाजेच्या सुमारास बाजूने जाणारी बस धडकल्याने पिकअप खड्ड्यात उलटून हा अपघात घडला. याची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---

## दुचाकी पळवणाऱ्या तडीपार आरोपीला अटक

✔ सोलापूर/प्रतिनिधी

दमदाटी करुन दुचाकी पळवून नेणाऱ्या तडीपार आरोपीस फौजदार चावडी पोलीसांनी दोन तासात अटक केली. सोहेल मुनाफ पिरजादे (वय ३०, रा. पाथरुट चौक, सोलापूर) हा २४ नोव्हेंबर रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास विजापूर वेस येथे चहाचे दुकान उघडण्याची वाट पहात होता. यावेळी अशरफअली उर्फ टिपू मन्नान बागवान याने त्यास मारहाण करीत त्याच्याकडील दुचाकी घेऊन पळून गेला.

याबाबत सोहेल याने लागलीच फौजदार चावडी पोलीसांशी संपर्क साधला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखेचे पथक आरोपीच्या मागावर पाठवले. गुन्हे शाखेच्या पोलीसांनी अवघ्या दोन तासात टिपू बागवान यास शहराबाहेर पळून जाताना पकडले. त्याच्याकडून दुचाकी जप्त करण्यात आली. टिपू बागवान हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. तरीदेखील तो सोलापुरात आला होता. फौजदार चावडी पोलीसांनी त्यास अटक करुन गुन्हा दाखल केला आहे.

---

## पोलिसाचे बंद घर फोडून तीन लाखांचे दागिने लंपास

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

येथील शिवाजी नगर, स्टेशन रोड येथे अज्ञात चोरटयाने पोलिसाच्या घरात चोरी करून तब्बल ३ लाखांचे सोन्याचे-चांदीचे दागिने लंपास केला. ही घटना २३ नोव्हेंबर रोजी रात्री १० ते २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान घडली. याबाबत उत्तर पोलीस स्टेशन मध्ये अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पूनम किरण पवार (वय ३९) यांनी फिर्याद दिली आहे. पूनम यांचे पती पोलिस विभागात असून ते वाहतूक सुरक्षा विभाग, पाकणी टॅप येथे नेमणुकीस आहेत. ते पत्नी पूनम व त्यांच्या मुलींना भेटण्याकरीता खापोली येथे गेले होते. २२ नोव्हेंबर रोजी त्यांची पुणे येथे ड्युटी लागल्याने ते तिकडे गेले होते. ही संधी साधत चोरट्याने त्यांचे घर फोडले.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तिजोरी भरेल, असं कोणी बोलतच नाही !

संगम श्री डे
226-03-120

संगम श्री नाईट
890-77-467


कल्याण
126-97-890

मुंबई
468-84-356

---

## समायोजनामुळे मराठीच्या ६०० शाळा बंद होणार?

✔ पुणे/प्रतिनिधी



शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार राज्यातील शाळांमध्ये शिक्षक समायोजनाची प्रक्रिया झाल्यास राज्यातील मराठी माध्यमाच्या ६०० पेक्षा अधिक शाळा बंद होण्याची भीती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाने व्यक्त केली आहे. तसेच, सध्या समायोजनाची प्रक्रिया थांबवून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा सेवकसंच मंजूर झाल्यावर समायोजन करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे अध्यक्ष तानाजी माने, कार्याध्यक्ष शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, सचिव नंदकुमार सागर यांनी याबाबत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना मागणीचे निवेदन दिले आहे.

१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा सेवकसंच मंजूर झाला आहे. त्यात राज्यातील सुमारे ६०० शाळांमध्ये एकही शिक्षक मंजूर झालेला नाही, तर तितक्याच शाळांमध्ये शिक्षक निम्म्यापेक्षा कमी झाले आहेत. १५ मार्च २०२४ च्या सेवकसंच शासन निर्णयात दुरुस्ती करण्याच्या मागणीसाठी अनेक शाळा, संघटनांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. मात्र, या याचिका न्यायालयाने फेटाळल्या आहेत. त्यामुळे शिक्षण संचालकांनी ५ डिसेंबरपर्यंत शिक्षक समायोजन प्रक्रिया राबवण्याचे निर्देश दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या सेवकसंचानुसार राज्यातील सुमारे ६०० मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा या वर्षी बंद पडतील, या शाळांतील २५ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी शाळाबाह्य होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. मुख्याध्यापक महामंडळाने शिक्षणमंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीत १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयात दुरुस्ती करावी, डोंगराळ आणि आदिवासी भागात विद्यार्थी संख्येची अट कमी करण्याची मागणी केली होती. त्यावेळी डोंगराळ आणि आदिवासी भागांमध्ये सेवक संचाचे निकष बदलण्याचे आश्वासन शिक्षणमंत्र्यांनी दिले होते. मात्र, त्यानुसार अद्याप शासन निर्णयात दुरुस्ती न झाल्याने शिक्षक समायोजन सुरू करण्यात आले आहे.

संबंधित शिक्षकांचे शैक्षणिक वर्षाच्या मध्येच समायोजन झाल्यास दहावीच्या विद्यार्थ्यांबाबत मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये काही शाळांमध्ये विद्यार्थी संख्येत वाढ झालेली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत समायोजनाची प्रक्रिया थांबवावी, डोंगराळ आणि आदिवासी भागात विद्यार्थी संख्येची अट शिथिल करावी, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा सेवकसंच मंजूर झाल्यानंतर समायोजन प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही मुख्याध्यापक महामंडळाने केली आहे.